# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रारीची तपासणी सूची

## क्र. रामाआ/तक्रार/२८०/२०२२/अहिल्यानगर

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री.बसारत धुमाल पिंजारी,<br>रा.वॉर्ड नं.२, काझी बाबा रोड, मक्का मस्जिद जवळ,<br>मु.पो.ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर. | मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर. |

## सुनावणी दिनांक-२४/०६/२०२४

तक्रारदार यांनी दि.१८/०४/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " राज्य माहिती आयुक्त नाशिक यांनी दिलेला आदेशाप्रमाणे माहिती मिळावी, माहिती अधिकार मध्ये ७ ते ८ मुद्दे आहे प्रत्येकाचे उत्तर मिळावे व माहिती अधिकार जानेवारी मध्ये दिलेले आहे त्यांचे उत्तर मिळावे व अपील सुध्दा केलेले आहेत त्याचे उत्तर मिळावे " असे कारण नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सुनावणीसाठी — तक्रारदार आणि तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

३. तक्रारदार यांनी मूळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"सन-१९७७ ते सन-२०१५ या कालावधीतील नगरपरिषद हद्दीतील सिटी सर्वे नं.१५६९ बी, फायनल प्लॉट ४६, जुना गट नंबर ७३/२ पैकी नगररचना स्किम नंबर १ चे मंजुर रेखांकन १) नगर भुमापन मधील स.नं.१५६९ बी सुची धारिका ची नक्कल १५६९ बी चा मोजणी नकाश १५६९ बी फाळणी नकाशा तसेच २) नगर भुमापन फायनल प्लॉट नं.४६ चा नकाशा बाबत माहिती."

४. आयोगाने द्वितीय अपिल क्र.२५६/२०२०/अहिल्यानगर संदर्भात दि.०६/०४/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

"विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर. यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दि.३०/०७/२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर अपिलार्थीस त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन आवश्यक माहिती नियमानुसार शुल्क आकारुन पुरवावी."

५. सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद विचारात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर. यांनी आयोगाच्या दि.०६/०४/२०२२ रोजीच्या आदेशानुसार मौजे श्रीरामपूर सि.स.नं.१५६९ बी मिळकत पत्रिका उतारा, नगर भूमापन आलेख, चौकशी रजिस्टर उतारा, फेरफार नक्कल अर्जदार यांना पुरविण्यात आले. त्या व्यतिरिक्त मागणी केलेले अभिलेख याबाबत अभिलेखात कसून शोध घेतला असता त्यांचा आढळ होत नाही. त्यामुळे अर्जदार यांना माहिती पुरविता येत नाही. परिरक्षण भूमापक(शहर) यांचेकडे उपलब्ध असलेल्या नकला प्राप्त करुन घेऊन त्याबाबत रितसर शुल्क रुपये २०५/- आकारुन दि.१४/०२/२०२३ रोजी अपिलार्थी यांना पुरविण्यात आलेल्या आहेत. असे दिसून येते.

६.	सुनावणी दरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाच्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती तक्रारदाराला पुरविलेली आहे त्यामुळे प्रस्तुतची तक्रार पुढील चौकशीयोग्य ठरत नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्र.२८०/२०२२/अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ९८०२ 10 MAR 2025